# विभागीय आयुक्त यांचे कार्यालय, अमरावती

**आयएसओ ९००१ : २००८ मानांकित कार्यालय**

बायपास रोड, कॅम्प, अमरावती - ४४४ ६०२

*दूरध्वनी ०७२१-२६६२०३४/२५५२९२३* **फॅक्स** *०७२१-२६६२७८२*

ईमेल : amravati_divcom@rediffmail.com **वेबसाईट :** http://amravatidivision.gov.in


क्र.विआअ/म.शा.३/प्र.क्र.२२.१/२०१४ दि.०६.०६.२०१४

## विभागीय आयुक्त,अमरावती यांचे कार्यालयातील लघुलेखक निम्नश्रेणी (मराठी) पदभरती-२०१४

### उमेदवारांकरिता सर्व साधारण सुचना

(१) विभागीय आयुक्त, अमरावती यांच्या आस्थापनेवरील निम्नश्रेणी लघुलेखक (मराठी) या पदाकरिता दि.३१.०१.२०१४ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. निम्नश्रेणी लघुलेखक पदाकरिता बहूपर्यायी परिक्षा रविवार दि.२९.०६.२०१४ रोजी घेण्यात येणार आहे.

परिक्षा केंद्र : शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती.

परिक्षेचे वेळापत्रक खालील प्रमाणे :

अ) दिनांक २९.०६.२०१४ (रविवार)

| अ. क्र. | बाब | | वेळ |
|---|---|---|---|
| १ | बहू पर्यायी परिक्षा | : | सकाळी १० ते १२.०० |
| २ | बहू पर्यायी उत्तर पत्रिका तपासणी | : | दुपारी १२.०० ते ०२.०० वा. |
| ३ | बहू पर्यायी परिक्षेच्या अनुषंगाने यादी प्रसिध्द करणे. | | दुपारी ०२.०० वा. |
| ४ | श्रुतलेखन व टंकलेखन परिक्षा | | दुपारी ०३.०० ते ०५.०० वा. |
| ५ | श्रुतलेखन व टंकलेखन परिक्षांची पेपर तपासणी व सदर परिक्षेत उत्तीर्ण उमेदवारांची यादी प्रसिध्द- | | दुपारी ०५.००वा नंतर. |

ब) दि.३०.०६.२०१४ (सोमवार)

| अ.क्र. | बाब | | वेळ |
|---|---|---|---|
| ६ | कौशल्य चाचणीमध्ये उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची दस्तावेज तपासणी व नंतर मौखीक परिक्षा. | | सकाळी १०.०० ते ०३.०० |
| ७ | बहू पर्यायी परिक्षा, कौशल्य चाचणी व मौखिक परिक्षेमध्ये प्राप्त गुणांच्या आधारे पात्र उमेदवारांची अंतीम निवडसूची प्रसिध्द करणे. | : | दुपारी ०५.०० वा. |

(२) उमेदवारांचे ओळखपत्र पोस्टाने निर्गमित करण्यात आले आहेत. तसेच ज्या उमेदवरांना ओळखपत्र दि.१६.०६.२०१४ पर्यंत प्राप्त होणार नाहीत त्यांनी विभागीय आयुक्त कार्यालयाच्या संकेतस्थळावरुन प्राप्त करुन घ्यावेत अथवा विभागीय आयुक्त कार्यालयातील महसूल शाखेत संपर्क साधावा.

(३) उमेदवारांनी त्यांचे स्वत:चे निवडणूक ओळखत्र, ड्रायव्हींग लायसन्स, पासपोर्ट, पॅन कार्ड अथवा आधार कार्ड यापैकी कोणतेही एक ओळखपत्र सोबत आणने अनिवार्य आहे.

(४) उमेदवारांनी उत्तर पत्रिका व्यवस्थीत राहण्याकरिता कार्डबोर्ड सोबत आणावे व बहूपर्यायी लेखी परिक्षेमध्ये केवळ काळ्या रंगाच्या शाईच्या बॉलपेनचा वापर करणे बंधनकारक आहे.

(५) कोणत्याही प्रकारचे ईलेक्ट्रॉनीक उपकरण / मोबाईल यासारखे साहित्ये परिक्षा केंद्रावर आणण्यास सक्त मनाई आहे.

*(टिपणी मा.विभागीय आयुक्तांकडून अनुमोदीत)*

विभागीय आयुक्त, अमरावती
करिता